तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातून अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय महसुल अर्हता परीक्षा व तलाठी संवर्गाच्या दुय्यम सेवा परीक्षेचा दस्तऐवज नष्ट करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

महसुल व वन विभाग

परिपत्रक क्रमांक परीक्षा २००५/प्र.क्र.११७/ई-१०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २० जून २००५

**परिपत्रक :**

महसुल विभागातील तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातून अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय महसुल अर्हता परीक्षा व तलाठी संवर्गाच्या दुय्यम सेवा परीक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व परीक्षेशी संबंधित कागदपत्र किती कालावधीपर्यंत जतन करून ठेवण्यात यावेत, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत साकल्याने विचार करून परीक्षेचा दस्तऐवज जतन करणे/नष्ट करणे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

महसूल S.O. file
EST-IV
1317

१.तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातून अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय महसुल अर्हता परीक्षा व तलाठी संवर्गाच्या दुय्यम सेवा परीक्षेच्या प्रश्नपत्रिका व परीक्षेशी संबंधित कागदपत्र (उत्तरपत्रिका वगळून) परीक्षा झाल्यानंतर सहा महिन्यांनी नष्ट करण्यात यावेत. मात्र प्रश्न पत्रिकेच्या दोन प्रती निवड नस्तीवर जतन करण्यात याव्यात.

२. अंतिम दोन वर्षाच्या उत्तरपत्रिका जतन करण्यात याव्यात. त्यापूर्वीच्या उत्तरपत्रिका नष्ट करण्यात याव्यात मात्र असे करतांना त्यांचे गोपनीय स्वरूप विचारात घेवून नष्ट करतांना आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - EST
आवक नं. 3999/2005
6 JUL 2005
टिप्पणी नोंद वही नं. 5
कार्यविवरण नं. -
लि. नि.उ.नि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उषा दाते)
कार्यासन अधिकारी

प्रति,
Kon with S.O. file
१. सर्व विभागीय आयुक्त